दिनांक ३१/०१/२०२४

# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ३१/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

## दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोस्टे वलगाव अप क्र 33 /2024 कलम 324,323, 506भा.द. वि. प्रमाणे दाखल . | ग्राम शिराळा फिर्यादीचे दुकानासमोर | 30/01/2024 चे 8.00वा. दरम्यान दाखल दि.30/01/2024 चे 18/06 वा. | शुभम गणेशराव माहोरे वय-26 वर्ष शिक्षण- पदवी,व्यवसाय- हॉटेल चालवणे रा.शिराळा ता.जि.अमरावती | 1) अनिकेत खडसे वय 26वर्ष 2) देवानंद मेश्राम वय 29वर्ष रा. शिराळा ता.जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, दि.29/01/2024 रोजी रात्री 09/00 च्या दरम्यान अनिकेत खडसे यांचे पानठेला समोर काही लहान मुलांचे भांडण सुरू असल्याचे दिसल्याने तेव्हा मी तेथे जावुन भांडण सोडविले आणी त्यानंतर मी माझे घरी निघुन गेलो. त्यानंतर आज दि.30/01/2024 रोजी सकाळी 08/00 वा. दुकाणातील मजुर सुशांत सावरकर व पियुश बोबडे यांचेसह दुकानातील मजुरांसह हॉटेलजवळ उभा असताना अनिकेत खडसे व देवांनंद मेश्राम हे आले व त्यांनी मला तु मुलांचे भांडण कशाला सोडवले. तेव्हा मी अनिकेत खडसे व देवांनंद मेश्राम यांना समजावुन सांगत होतो परंतु अनिकेत खडसे याने कुठलाही विचार न करता मला त्याचे हातातील काठीने पाठीवर मारले आणी देवानंद मेश्राम याने लाथा बुक्क्यांनी मारहान केली.त्यानंतर मी घडलेल्या प्रकारामुळे घाबरलो होतो तसेच तब्बेत बरी नसल्यामुले घरी गेलो बरे वाटल्यानंतर मी पोलीस स्टेशनला येवुन रिपोर्ट देत आहे. तरी अनिकेत खडसे याने मला काठीने पाठीवर मारहान केली तसेच देवानंद मेश्राम याने लाथा बुक्यांनी मारहान करून दोघांनी काठीने मारण्याची धमकी दिली आहे. तरी त्यांचेवर कार्यवाही व्हावी. हाच माझा जबानी रिपोर्ट असुन मी सांगितलेप्रमाणे लिहीला असुन वाचुन पाहीला असता बरोबर आहे. अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १०८/२०२४ कलम ३५४(ड)३५४(अ),३२३ भादवी | अमरावती | दि ३०.१.२०२४ चे ०८.०० वा दरम्यान दि ३०.१.२०२४ चे १९-१४ वा | एक महीला | नितेश भटकर रा अमरावती | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी ओळखीचे फि ही असुन हॉस्पीटल येथे काम करते फिर्यादी ही घरुन स्वयापाकाचे काम करण्यासाठी निघाली असता आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करुन फिला म्हणाला की तुझ्या सोबत शारीरीक संबंध ठेवायचे आहे व त्याने फि चे उजव्या व डाव्या हाताला मारहान करुन ढकले व तिथुन निधुन गेला.अशा फि चे जाबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. साबर अप.नं. ०६/२०२४ कलम ३५४,३५४(अ),३६४(ड),५००, भा.द.वि सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान कायदा | अमरावती | दि. ०७/०१/२०२४ ते ३०/०१/२०२४ दरम्यान दि. ३०/०१/२०२४ चे २०.२६ वा. | एक महीला | १) मो.क्रं. ८८०९९६९६९१ २) https://www.facebook.com/profile.php?id=६१५५५१०६३८२७८५&mibextid=ZbWKwL चा धारक | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे नावाचे बनावट फेसबुक अकाऊंट तयार करुन त्यावर फिर्यादीचा फोटो वापरुन फोटो सोबत अश्लील Text लिहुन तसेच नग्न फोटो पोस्ट केला. तो इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन सारखा फिर्यादीचा पाठलाग करुन अश्लील मॅसेज पाठवुन तसेच फिर्यादीच्या नावाचे बनावट फेसबुक अकाऊंट वरुन फिर्यादीचे फोटो, अश्लील फोटो व अश्लील मजकुर पोस्ट करुन फिर्यादीचा विनयभंग केला अशा फिर्यादिच्या जबाबावरुन सदरचा गुन्हा दाखल |

# आत्महत्तेस प्रवृत्त

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर अप क्र ८७/२०२४ कलम ३०६, ३४ भादवी | अमरावती | दि ३०/०१/२०२४ चे १४/४५ वा. दा ता वेळ दि ३०/०१/२०२४ चे २०/४७ वा. | एक महीला | १. सलीम खान २. वाील दोन्ही रा. अमरावती | यातील हकिकत अशा प्रकारे आहे कि दि ३०/०१/२०२४ रोजी फि ही अकोला येथे गेली असता दुपारी १४/४५ वा दरम्यान फि चा मोठा भाउ याने फि ला फोन करुन सांगीतले कि, मि विष घेतले आहे. फि ने तु विष का घेतले असे म्हटले असता त्याने फोन कट केला. त्यानंतर फि ने तिचे चुलत भाउ व नातेवाइकांना फोन करुन माहीती दिली फि सुध्दा अमरावती ला निघाली फि चे भावाला चुलतभाउ व त्याचा मित्रयांनी ईविन दवाखाना येथे उपचारा करीता नेलण तेथील डॉक्टरांनी तपासुन इलाजा करीता वॉड क्र ३० मध्ये भरती केले व त्याचेवर उपचार करीत असतांना तो मरण पावला असे डॉक्टरांनी फि ला सांगीतले तरी फि चा भाउ यांना शेत व प्लॉटचे व्यवहारात वर नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फसवुन पैसे दीले नाही. म्हणन मानसीक तणावामुळे तसेच त्याच्या आजाराला कंटाळुन फि चे भाउ यांनी विष प्राशन केले आहे. अशा फि चे जबाणी रिर्पोट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# जबरी चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १०७/२०२४ कलम ३९४, ३४ भादवी | अमरावती | दि ३०.१.२०२४ चे सकाळी १०.२० ते ११.०० वा दरम्यान<br><br>दि ३०.१.२०२४ चे १४.३८ वा | एक महीला | अनओळखी इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी दि ३०.१.२०२४ चे सकाळी १०.१५ वा माझे पती ऑफीसला घरून निघुन गेले मी एकटीच घरी होते तेव्हा अं ११.०० वा चे दरम्यान मला घरी कोणी आहे का असा आवाज दील्याने मी हॉलचेगेट दरवाज्याजवळ आले असता दोन पुरूष वय अं ३० ते ३२ वर्ष तोडाला मास्क व दुप्पटा बांधलेला त्यापैकी एकाचे अंगात काळया रंगाचे जर्कीग पॅन्ट निळया रंगाचा व तोडाला पांढ-या रंगाचा दुपटटा बांधलेला होता व दुस-याने स्क्रीम कलरचे जर्कीग व निळया रंगाचा जिन्स पॅन्ट व तोटाला मास्का लावलेला होता व घरात आले व मला म्हणाले की आम्ही जनगनने करीता आलेलो आहोत आम्हाला तुमच्या घरातील सदरची माहीती सांगा नाव गाव पत्ता व आधार नं सांगा असे म्हटले मी आधार कार्ड आणने करीता बेडरूम मध्ये गेले ते दरवाज्या मध्येच उभे होते मी आतुन आधार र्काड आणुन दाखवले नंतर त्यांनी त्यांनी नंबर लीहीला मला प्यायला पाणी मांगीतले तर मी कीचनमध्ये पाणी आणण्याकरीता गेले व मी गडवा ग्लास घेवुन हॉलमध्ये आली तर त्यांनी मला हॉल मध्ये खाली पाडले व क्रीम कलरच्या जर्कीग वाल्यानी माझ्या गळयाला चाकु लावला व मला उचलुन बेडरूम मध्ये नेले व कपाट उघडुन माझे पर्स मधील ७००० रू त्यांनी घेतला नंतर मला हॉलमध्ये आणुन जिण्याचे रेलींगला मला माझ्याच घरातील गाउननी बांधुन ठेवले व माझे तोंडाला त्याच्या जवळील असलेली चीकनपटटी तोंडाला चीपकवली व माझे हातातील सोन्याच्या बांगळया ६० ग्राम च्या की अं ३७,२००० रू तसेच गळयातील मीनीमंगळसुत्र २० ग्राम सोन्याचे की अं १,२४००० रू असा एकुन ५,०३,००० रू चा मुददेमाल कोणी चाकुचा व बंदुकाचा धाक दाखवला बोटाला चाकु लागला आहे व रक्त निघाले वरून सदर चा गुन्हा दाखल |

फसवणुक

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ११०/२०२४ कलम ४२० ,४६५,४६८ ,४७१भादवी | कार्यकारी भियंता अमरावती मध्यम प्रकल्प विभाग अमरावती | दि ०२.११.२०२१ रोजी पासुन ते दि,०२.१२.२०२१ चे दरम्यान दि ३०.१.२०२४ चे २३.२१ वा | श्री आशिष मुरलीधर राऊत वय ३८ वर्ष रा लघु पाटबंधारे उपविभाग धारणी अमरावती | श्री सुभाष ईश्वर सुर्यवंशी रा करोळी ता कवठेमहाकाळ जि सांगली | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी गर्गा मध्यम प्रकल्प ता धारणी जि अमरावची या प्रकल्पाचे लाभ क्षेत्रातील झोन २ च्या मुख्य नलिकेचा सा क्र ० ते ०८.५० कि मी व झोन ३ च्या मुख्य नलिकेचा सा क्र ० ते ४.४० किमी च्या बंद मलिका वितरण प्रणालीचे बांधकाम करण्याबाबत शासनाला ऑनलाईन ई- निवीदामध्ये अँथनिस लेटर नं केएनएनएल आर .आर डिआयव्ही/अँथनी/एएस/वाईड/२०२३-२०२४/२८५ दि.१७.०६.२०२३ अनुभवाने खोटे व बनावट लेखी पत्र सादर करुन शासनाची फसवणुक केली.अशा फि चे जाबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो.स्टे. सायबर अप.नं. ०५/२०२४ कलम ४१९,४२०, भा.द.वि. सहकलम ६६(क),६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा | अमरावती | दि. २९/१२/२०२३ चे १८.०० ते दि. २०/०१/२०२४ दरम्यान दि. ३०/०१/२०२४ चे १४.०६ वा. | एक इसम | १) व्हाट्सअप मो.क्रं. +१७८६९५६-६२९१२ २) +१३०५५४०-८७१८ या वरील https://numbenisusai.vsisk.com/#/pages/auth/sign?code=adra४rdb, https://chatwhatsap.com/BIDUUeVtKVSA८FyrBVAtVC ३) Golden auto Parts and Garge IndusInd Bank A/C No. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीला Num Genius (Artificial Intelligence) या अँपवर जॉईन होण्याकरीता लिंक पाठवुन व्हाट्सअप ग्रुप वर जॉईन होण्यास सांगितले व रक्कम गुंतवणुक केल्यास त्यावर चांगला नफा मिळेल असे सांगुन फिर्यादीला वेगवेगळ्या बँक खात्यात पैसे भरण्यास भाग पाडुन फिर्यादीची एकुण ३०,४१,५६१/- रुपयाने ऑनलाईन फसवणुक केली अशा फिर्यादीच्या जबाबावरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | २०१०२८६६१०३७<br>४) Minima Impex Punjab National Bank A/C ९०१३००५५००००००१०<br>५) Bhagwati Treding Company, IndusInd Bank A/C २५९६१०३२२६२० IFSC- INDB००००५९२<br>६) P S Enterprises, Punjab National Bank A/C No. ००८३२०२१००००००७६३ IFSC ङ PUNB०००८३२०<br>७) Shri Shyam Traders + इतर २४ कपंनी धारक | |

## वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती ाहर अप क्र ८६/२०२४ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि. २९/०१/२०२४ चे ०५/३० वा ते दि ३०/०१/२०२४ चे ०८/३० वा. दाखल ता वेळ दि ३०/०१/२०२४ चे १७/५४ वा. | एक महीला | अज्ञात | हकिकत अशा प्राकरे आहे यातील फि यांनी पो स्टे ला येवुन जबाणी रिर्पोट दिला कि,फि ची गाडी क्र एम एच २७ सि एपफ दृ ८३८९ क्रांकाची होंन्डा अॅक्टीव्हा कंपनीची ग्रे रंगाची मोपेड गाडी अंदाजे किं ४०,००/—रु ची नमुद घ ता वेळी व ठिकाणी घराचे समोर उभी करुन ठेवली होती दि ३०/०१/२०२४ चे सकाळी ०८/३० वाण गाडी पाहीली असता उभी करुन ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही. तिचा आजुबाजुला शोध घेतला , चौकशी केली असता मिळुन आली नाही फि ची गाडी कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याची खाञी झाल्याने पो स्टे ला येवुन रिप्रेट दिला. अशा फि चे जबाणऎी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे बडनेरा अप.क्र. ३६/२४ कलम ३७९ भा.दं.वि. | गांधी विद्यालय रेल्वे स्टेशन पाण्याच्या टाकीजवळ जुनी वस्ती बडनेरा | घटना ता.वेळ - दि.२९.०१.२०२४ चे ११.३० वा. ते ११.४५ वा. माहिती ता.वेळ - दि.३०.०१.२०२४ चे १४.३० वा. दाखल ता.वेळ - दि.३०.०१.२०२४ चे १५.२१ वा. | पियुष महेश गांधी वय- २१ वर्ष रा. मेन रोड शनि मंदीर जवळ खेळमाळी ता.जळगाव जामोद जि.बुलढाणा ह.मु.गोपाल नगर शिव हरी अपार्टमेंट अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे राम मेघे कॉलेज येथे इंजिनीयरिंग करित शिक्षण घेत आहे. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी त्यांची बहिण ही महाराष्ट्र एक्सप्रेस ने नागपुर जाणार होती. वरुन फि.यांनी त्यांचे वाहन क्र. MH २८ AF ७३७९ ही नमुद ठिकाणी उभी करुन प्लँटफॉर्म वर गेले असता नंतर तेथुन आल्यास त्यांना त्यांचे वाहन नमुद ठिकाणी दिसुन आले नाही. ती कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली असावी अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | राजापेठ अप क्र.७०/२०२४ कलम ३७९ भादवी | नंदा मार्केट मेडीकल स्टोअर अमरावती | दिनांक २९/११/२०२३चे०३.५८वा सूमारास दा. ता. वेळ दिनांक ३०.०१.२०२४ चे १९/०१ वा. | श्री.विजय मारोतसीग राठोड वय ६० वर्ष धंदा मजूरी रा.ठी.बेलपूरा हनूमान मंदिराच्या मागे अमरावती | एक अनोळखी चोरटा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमूद फी.हे दि.२९/११/२०२३ रोजी दूपारी ०३.५८ वा सूमारास नंदा मार्केट येथे मेडीकल स्टोर मध्ये गेले असता त्यांनी त्यांची मोटार सायकल ही मेडीकल स्टोर समोर पार्क केली व चाबी काढायला विसरले ते औषध घेवून परत आले असता त्यांना त्यांची मोटार सायकल मीळून आली नाहि आजुबाजूला शोध घेतला आर टी ओ ऑफीस ला जावून ही शोध घेतला मीळून आली नाही .आज रोजी फि.यांनी नंदा मार्केट येथे दुकानात असलेले सी सी टीव्ही फूटेज पाहीले असता एक ईसम त्यांची मोटर सायकल घेवून जात असतांना दिसला म्हणुन त्याची खात्री झाली की एका अनोळखी चोरटयाने त्यांची मोटार सायकल चोरू न नेली म्हणून ते तक्रार देण्यासाठी पो स्टे ला आले असे फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून व म.स.क. अमरावती शहर यांचे अहवालावरून सदरचा गुन्हा दाखल |

# चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे बडनेरा अप क्र.३७/२०२४ कलम ३८०,५११ भादवी | राहते घरी आदित्या कॉलनी निर्मला कॉलनी मागे जुनी वस्ती बडनेरा | दि.२९.०१.२०२४ चे २२.०० वा ते ३०.०१.२०२४ चे ००.०० दि.३०.०१.२०२४ चे २१.०१ वा | सागर अरविंदराव इंगोले वय -३३ वर्ष रा. आदित्या कॉलनी निर्मला कॉलनी मागे जुनी वस्ती बडनेरा | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे त्यांच्या घराचे दरवाजाला कुलुप लावुन हॉटेल मध्ये जेवण करण्याकरिता गेले व परत आले असता त्यांना त्यांच्या घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यांनी घरात कोण आहे, असा आवाज दिला असता कोणीतरी अज्ञात इसम त्यांच्या समोरून घरातुन बाहेर पळतांना दिसुन आला. त्याचा पाठलाग केला असता तो मिळुन आला नाही. फिर्यादीने घरात जाऊन पाहणी केली असता घरातील सामान अस्ताव्यस्त दिसुन आले. कोणतेही सामान चोरी झाल्याचे दिसुन आले नाही. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १११/२०२४ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि ३०.१.२०२४ चे २०.०० वा दरम्यान दि ३०.१.२०२४ चे २३.२२ वा | एक महीला | अज्ञात इसम | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी तीचे मुलीसोबत निरंकारी याचा सत्संग करिता गेले असता फिर्यादी चे गळयातील १५ ग्राम सोन्याची चैने किं अं ४५००० रु ची कोठेतरी पडली असावी किंवा कोणीतरी अज्ञात इसमाने चोरली. अशा फि चे जाबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १०९/२०२४ कलम २७९,३३७ भादवी | शेगाव ते पंचवटी चौक अमरावती | दि ३०.१.२०२४ चे १२.३० वा दरम्यान<br><br>दि ३०.१.२०२४ चे २०.०७ वा | जुनेदा खान रज्जाक खान वय २७ वर्ष रा अलमास नगर जुनी वस्ती बडनेरा | गाडी क्र एम एच २७ डि एल ५१४६ चा चालक | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्याचे खाजगी कामाकरिता त्यांची मोसा क्र एम एच २७ डी एफ १२४० ने शेगाव ते पंचवटी चौककडे जाच असताना एक फोरव्हीलर गाडी क्र एम एच २७ डीएल ५१४६ ही गाडी रॉंद साईडने भरधाव वेगाने येवुन फि ची गाडी ला मागुन धडक दिल्याने फि खाली पडले व मुका मार लागला.अशा फि चे जाबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हिशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | बडनेरा | अप क्र.३८/२४ कलम ६५ (ई) | दारुविक्री | दि ३०.०१.२०२४ चे २१.०० वा | दि.३०.०१.२०२४ चे २२.१४ वा | सरतर्फे नापोका इरफान रायलीवाले ब.न. १८७१ पो स्टे बडनेरा अम शहर | राजेश शामराव भोकरे वय-४२ वर्ष रा. कंपासपुरा जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १० नग देशी दारू बॉंबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ७००/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |